**ठळक बातम्या**

अनंतचतुर्दशीच्या दिवशी लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप

बहुपक्षीय जागतिक व्यापारपद्धतीप्रति भारत वचनबद्ध असल्याचं केंद्र सरकारचं शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीत प्रतिपादन

प्रधानमंत्र्यांची फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांशी दूरध्वनीवरून महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत अग्रमानांकित अरीना साबालेंका सलग दुसऱ्यांदा अजिंक्य

**आणि**

आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत चीनचा पराभव करुन भारतीय संघ अंतिम फेरीत दाखल, अंतिम लढत कोरियाशी

**<><><><>**

देशभरात काल अनंतचतुर्दशीच्या दिवशी गणपती विसर्जनाने गणेशोत्सवाच्या मंगलपर्वाची सांगता झाली. पुढच्या वर्षी लौकर येण्याचं आवाहन करीत लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला.

मुंबईत अनंतचतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप देण्यासाठी सुरू झालेली विसर्जन मिरवणूक अद्याप सुरू आहे. कालपासून गिरगाव चौपाटीसह विविध विसर्जन स्थळांवर बाप्पाचं दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी दिसून येत आहे. याबद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी***

*(मुंबईच्या गणेशविसर्जन सोहळ्याचं आकर्षण असलेल्या लालबागच्या राजाचं विसर्जन तराफ्यातल्या बिघाडामुळे बराच वेळ खोळंबलं होतं, ते काही वेळापूर्वी गिरगाव चौपाटीवर झालं. तसंच उमरखाडीचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी यासह सुमारे २० सार्वजनिक गणेशमंडळांच्या मानाच्या बाप्पाचं विसर्जनही शांततेत होत आहे. भर पावसातही लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक गणरायांचं दर्शन घेण्यासाठी रस्त्यावर गर्दी केली आहे. त्यांच्या सोयीसाठी विविध स्वयंसेवी संस्था आणि राजकीय पक्षांनी ठिकठिकाणी स्टॉल्स उभारले आहेत. विसर्जन मिरवणूक सुरळीत पार पाडण्यासाठी*

*गिरगाव चौपाटीवर ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. मिरवणुकीत मुंबईत नैसर्गिक आणि कृत्रिम विसर्जन स्थळांवर आत्तापर्यंत सुमारे २ हजार ७०० सार्वजनिक मूर्ती, २६ हजारापेक्षा घरगुती मूर्ती, तर ३०७ गौरींचं विसर्जन झाल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली आहे. अनंतचतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत बॉम्बस्फोट घडवून आणायची धमकी देण्यात आली होती, मात्र या प्रकरणातल्या आरोपीला काल मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं नोयडा इथून अटक केली.)*

हैदराबादमध्ये २ लाखापेक्षा जास्त गणेशमूर्तींचं विसर्जन शांततेत पार पडलं. खैरताबादच्या ६९ फूट उंचीच्या महागणेश मूर्तीचं विसर्जन हुसैनसागर तलावात करण्यात आलं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर-जी.एस.टी.च्या नव्या दरांचा कृषी क्षेत्राला मोठा लाभ होईल असं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. भोपाळ इथं काल पत्रकार परिषदेत बोलताना चौहान यांनी या बदलांचा विशेषतः लहान आणि मध्यम शेतकऱ्यांना फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला. शेतीचा खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांचा नफा वाढेल, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने या कराच्या रचनेत नुकतेच क्रांतिकारी बदल केले. यातल्या काही बाबींविषयी सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - व्हॉईस कास्ट...अंकिता - -**

*(पुढच्या पिढीचं भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीनं लहान मुलांच्या वापरातल्या विविध वस्तूंवरच्या करात कपात करण्यात आली आहे. त्यात बालकांना दूध पाजण्याच्या बाटल्या, निपल्स, डायपर्स, लहान मुलांची खेळणी, विशेषतः देशातल्या हस्तकला कारागीरांनी बनवलेल्या बाहुल्या, इत्यादींवर १२ टक्के ऐवजी ५ टक्के कर राहणार आहे.*
*पेन्सिल शार्पनर आणि खोडरबर यांच्यावरचा कर शून्य टक्के झालाय तर शालेय वह्या पुस्तकं, प्रयोगवह्या, ग्राफ वह्या, नकाशे, अध्यापनोयोगी उपकरणं यांच्यावरही शून्य टक्के कर राहील. कंपासपेट्या आणि रंगपेट्या, मुलांच्या तीनचाकी सायकली, हँडमेड कागद, दप्तरं, पाऊचेस, पत्त्यांचे कॅट, कॅरमबोर्ड आणि इतर बैठ्या आणि मैदानी खेळांचं साहित्य*

*यावरचा कर १२ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. ऐकूया याबाबत एका मातेची प्रातिनिधिक प्रतिक्रीया....*

**- - होल्ड- बाईट- रक्षिता - -**

*बाळांसाठीच्या दुधाच्या बाटल्या, निपल्स, डायपर हे साहित्य स्वस्त झालं तर बराच खर्च वाचेल. सुका मेवा आणि माल्ट सारखे पौष्टिक पदार्थ स्वस्त झाले तर मुलांना अधिक पौष्टिक आहार कमी खर्चात देता येईल. या वस्तू कमी किमतीला मिळतील अशी आशा वाटते.)*

*(मात्र उंची दर्जाचे विशेष वापरासाठीचे कागद, पॅकिंगसाठी वापरले जाणारे कोरोगेटेड पुठ्ठे या सामुग्रीवरचा कर १२ ऐवजी १८ टक्के करण्यात आला आहे. नवीन कररचना येत्या २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.)*

**<><><><>**

जागतिक व्यापार संघटनेबरोबर खुल्या, निःपक्ष आणि समावेशक पद्धतीच्या बहुपक्षीय व्यापार प्रणालीसाठीची वचनबद्धता भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने निवेदनात दिली आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या काल झालेल्या बैठकीत भारताने सामायिक समृद्धीसाठी सामूहिक प्रयत्न करण्यावरही भर दिला. निर्यातीमधलं अवलंबित्व कमी करणं, पुरवठा साखळीतली लवचिकता वाढवणं या बाबी आवश्यक असल्याचंही भारताने या बैठकीत अधोरेखित केलं. व्यापार प्रवाह वाढवण्यासाठी समावेशक धोरण अवलंबणं महत्त्वाचं असल्याचंही भारताने स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्याशी दूरध्वनीवरून आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा केली. युक्रेनमधे सुरू असलेल्या संघर्षावर शांततापूर्ण तोडगा काढण्याची भारताची भूमिका असल्याचं मोदी यांनी या चर्चेत सांगितलं. भारत आणि फ्रान्समधल्या द्विपक्षीय संबंधांचा दोन्ही नेत्यांनी आढावा घेतला. जगात शांतता आणि स्थैर्य कायम ठेवण्यासाठी भारत - फ्रान्स भागीदारी महत्त्वाची भूमिका पार पाडत राहील असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. पुढल्या वर्षी फेब्रुवारीमधे भारतात आयोजित एआय इम्पॅक्ट समिटचं आमंत्रण मॅक्राँ यांनी स्वीकारल्याबद्दल मोदी यांनी त्यांचे आभार मानले तसंच भारत मॅक्राँ यांच्या स्वागतासाठी उत्सुक असल्याचं म्हटलं.

प्रधानमंत्री मोदी यांनी नुकतीच युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँतोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देर लेयन यांच्याशी संवाद साधला. स्थैर्यासाठी भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातली धोरणात्मक भागीदारी महत्त्वाची असल्याबाबत यावेळी सहमती झाली.

**<><><><>**

जपानमध्ये सत्ताधारी पक्ष असलेल्या ‘एलडीपी’, अर्थात, ‘लिबरल डेमोक्रेटिक पार्टी’मध्ये पडणारी संभाव्य फूट टाळण्याकरता जपानचे प्रधानमंत्री शिगेरु इशिबा यांनी राजीनामा द्यायचा निर्णय घेतला आहे. जुलै महिन्यात इशिबा यांच्या एलडीपी प्रणित आघाडी सरकारनं तिथल्या वरिष्ठ सभागृहात बहुमत गमावल्यानंतर आता जपानचं सरकारी प्रसारमाध्यम असलेल्या ‘एनएचके’नं आज याबाबतचं वृत्त प्रसारित केलं. निवडणुकांमध्ये त्यांच्या आघाडी सरकारला पराभवाला सामोरं जावं लागल्यानंतर काही आठवड्यांपूर्वी पसरलेल्या त्यांच्या राजीनाम्याच्या वृत्ताचं प्रधानमंत्र्यांनी खंडन केलं होतं. अमेरिकेबरोबर सुरु असलेल्या करप्रस्तावाबाबतच्या अडकून पडलेल्या वाटाघाटी मार्गी लावायच्या असल्यानं आपण राजीनामा देणार नसल्याचं इशिबा यांनी गेल्या मंगळवारी सांगितलं होतं.

**<><><><>**

युक्रेनच्या क्विवमध्ये रशियानं केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात ३ जण ठार, १८ लोक जखमी झाले आहेत, तर सरकारच्या प्रशासकीय इमारतीसह किमान डझनभर इमारतींना आग लागून नुकसान झाल्याचं वृत्त आहे. अलीकडेच साडेतीन वर्षं सुरु असलेलं रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्याकरता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्ती केल्यानंतर रशियाकडून युक्रेनवर केल्या जाणाऱ्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याचं दिसून येत आहे.

**<><><><>**

बिहार इथे सुरू असलेल्या आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या सुपर फोर फेरीत भारतीय संघाने चीनचा ७-०ने धुव्वा उडवत अंतिम फेरी गाठली आहे. आता अंतिम सामन्यात भारताचा सामना कोरियाशी होणार आहे. सुपर फोर फेरीत मिळवलेल्या विजयामुळे सात

गुणांसह भारत गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. या स्पर्धेतल्या विजेत्या संघाला पुढच्या वर्षी होणाऱ्या हॉकी विश्वचषकासाठी पात्रता मिळवण्याची संधी मिळेल.

**<><><><>**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत अग्रमानांकित अरीना साबालेंका हिनं सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपदावर नाव कोरलं. तिनं अमांडा अनिसिमोव्हा हिच्यावर ६-३, ७-६ अशी थेट सेट्समध्ये मात करून कारकीर्दीतलं चौथं ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावलं. तर पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत मार्सेल ग्रॅनोलर्स आणि होरॅशिओ झेबोलास या जोडीनं जो सॅलिसबरी आणि नील स्कूपस्की यांच्यावर ३-६, ७-६, ७-५ असा विजय मिळवला. पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत आज रात्री उशिरा यानिक सिनर याचा सामना कार्लोस अल्काराज याच्याविरुद्ध होणार आहे.

**//<><><><>//**